# VJTI MUMBAI

**वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था**

**Veermata Jijabai Technological Institute**

**(Autonomous Institute of Govt. of Maharashtra)**

H. R. Mahajani Road, Matunga (East), Mumbai - 400 019

Phone:+91 22 24198101/102 • Fax:+91 22 24102874 • www.vjti.ac.in


100th YEAR OF VJTI AT MATUNGA

क्र.लेखा/शिवृ/फी तफावत/२०२१-२२/ ५२३३ /२०२३ — दिनांक : ०५.१२.२०२३

20 DEC 2023

**परिपत्रक :**

**विषय : सन २०२१-२२ मध्ये आकारण्यात आलेल्या फी च्या तफावतीबाबत**

**संदर्भ : Higher and Technical Education Department of State Government of Maharashtra vide letter no विधी -५०२०/प्रक्र६८/CET Cell/ ७६५२ दिनांक १ जुलै २०२१**

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रानुषंगाने संस्थेमधील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, मुंबई विद्यापिठाने पारीत केलेल्या परिपत्रकानुसार सन २०२१-२२ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून कोविड-१९च्या प्रादुर्भावामुळे इतर शुल्काची ५०% रक्कम आकारण्याचे आदेश निर्गमित केलेले होते. त्यानुसार महाडिबीटी संगणक प्रणालीवर फक्त सन २०२१-२२ च्या नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता प्रथम ते चतुर्थ वर्ष पदवी व पदव्युत्तर पदवी एम.सी.ए. आणि एम.टेक अभ्यासक्रमासाठी रू.२६,०००/- च्या ऐवजी रू.१०,११०/- आणि पदविका अभ्यासक्रमासाठी रू.२,७२५/- च्या ऐवजी रू.१,२५५/-इतके **इतर शुल्क** (Other Fees) मंजूर करण्यात आले आहे. तसेच प्रवेशाच्या वेळेस विद्यार्थ्यांकडूनसुद्धा इतर शुल्काची ५०% रक्कम आकारण्यात आलेली होती.

सन २०२२-२३ पासून नियमित वर्ग सुरू झाल्यानंतर पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी एम.टेक आणि एम.सी.ए. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून इतर शुल्काची १००% रक्कम आकारण्यात आली. परंतू सन २०२२-२३ पासून महाडिबीटी संगणक प्रणालीवर सन २०२१-२२ च्या मंजूर नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता ५०% रक्कमच पुढील चारही वर्षांकरीता मंजूर झाल्यामुळे शासनाकडून मंजूर न झालेली इतर शुल्काची ५०% रक्कम मिळविण्यासाठी संस्थेकडून शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. मात्र तरीही शासनाकडून फरकाची रक्कम मंजूर न झाल्यास फरकाची रक्कम विद्यार्थ्यांस भरावी लागणार आहे याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**प्रबंधक**

प्रत :

१. सर्व विभाग प्रमुख

यांना विनंती करण्यात येते की, सदरहू परिपत्रक आपल्या अंतर्गत असणा-या पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी एम.टेक आणि एम.सी.ए. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

२. ग्रंथालय, वसतिगृह प्रमुख, प्रशिक्षण आणि आस्थापना अधिकारी

३. सिस्टिम ॲनालिस्ट

कृपया संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करावे.

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE ★ MATUNGA, MUMBAI -19.